राज्यात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारण कामांच्या संनियंत्रणासाठी राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती आणि सदर कामांबाबत जलद निर्णय घेण्याकरिता राज्यस्तरीय कार्यकारी समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

मृद व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्रमांक : बैठक-२०२६/प्र.क्र.१०२ (E-१८८८७५२)/जल-७

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२६

<u>प्रस्तावना</u>:-

राज्यात सन २०२६ मध्ये पर्जन्यमानाचे प्रमाण कमी असल्याने २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत शासन निर्णय, दि. २५.०९.२०२६ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार जाहिर केलेल्या उपाययोजनांमध्ये "जलसंधारणाची कामे सुरु करणे" या उपाययोजनेचा समावेश आहे.

२. राज्यातील दुष्काळाच्या स्थितीस अनुसरून पाणी फाउंडेशन व चंद्रा फाउंडेशन यांच्यासारख्या स्वयंसेवी संस्था मृद व जलसंधारणाची कामे करण्याकरिता इच्छुक असून याबाबत प्राथमिक चर्चा करण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १०.१०.२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

३. राज्यात पाणी फाउंडेशनमार्फत वॉटर कपची पुन्हा सुरुवात करण्यात येणार असुन वॉटर कपच्या माध्यमातून जलसंधारणाची लोकचळवळ निर्माण होणार असल्याने कामांची गुणवत्ता राखली जाणे, भौतिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य होणे आणि अपेक्षित जलसंधारणविषयक परिणाम प्राप्त करण्याकरिता उच्चस्तरावर नियमित आढावा घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन श्री. आमिर खान, पाणी फाउंडेशन यांनी सदर बैठकीत केले.

४. सदर बैठकित मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती आणि प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

राज्यात दुष्काळावरील उपाययोजना म्हणून करण्यात येणा-या मृद व जलसंधारण कामांच्या संनियंत्रणासाठी **मा. मुख्यमंत्री महोदयांच्या** अध्यक्षतेखाली **राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती** आणि सदर कामांबाबत जलद निर्णय घेण्याकरिता **प्रधान सचिव, जलसंपदा विभाग** यांच्या अध्यक्षतेखाली **राज्यस्तरीय कार्यकारी समिती** स्थापन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती :

सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	समिती सदस्य	पदनाम
१.	मा. मुख्यमंत्री	अध्यक्ष
२.	मा. उपमुख्यमंत्री (सर्व)	सह अध्यक्ष
३.	मा. मंत्री, मृद व जलसंधारण	सदस्य
४.	मा. मंत्री, कृषि	सदस्य
५.	मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायतराज विभाग	सदस्य
६.	मा. मंत्री, जलसंपदा व लाक्षेवि	सदस्य
७.	मा. मंत्री, पाणी पुरवठा आणि स्वच्छता	सदस्य
८.	मा. मंत्री, रोहयो	सदस्य
९.	विशेष निमंत्रित सदस्य	सदस्य
१०.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मुंबई	सदस्य सचिव

३. समितीची कार्यकक्षा व जबाबदारी

a) राज्यात दुष्काळावरील उपाययोजना म्हणून करण्यात येणा-या मृद व जलसंधारण कामांचे संनियंत्रण व प्रगतीचा आढावा घेणे.
b) वॉटर कपच्या माध्यमातून निर्माण होणा-या लोकचळवळीचा आढावा घेणे.
c) राज्यात दुष्काळावरील उपाययोजनेकरिता स्वयंसेवी संस्थांच्या माध्यामातून करण्यात येणा-या मृद व जलसंधारण कामांचे संनियंत्रण व प्रगतीचा आढावा घेणे.

४. राज्यस्तरीय कार्यकारी समिती :

सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	समिती सदस्य	पदनाम
१.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, जलसंपदा विभाग, मुंबई	अध्यक्ष
२.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, कृषी विभाग, मुंबई	सदस्य

३.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, वन विभाग, मुंबई	सदस्य
४.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, मुंबई	सदस्य
५.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, वित्त विभाग, मुंबई	सदस्य
६.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, मुंबई	सदस्य
७.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, रोहयो, मुंबई	सदस्य
८.	अ.मु.स./ प्र.स./ सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मुंबई	सदस्य सचिव

५. राज्यस्तरीय कार्यकारी समिती कार्यकक्षा व जबाबदारी

a) राज्यात वॉटर कपच्या माध्यमातून करण्यात येणा-या मृद व जलसंधारण कामांसाठी व वॉटर कपच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध विभागांना आवश्यक ते निर्देश व मार्गदर्शन करणे.

b) राज्यात दुष्काळावरील उपाययोजनेकरिता स्वयंसेवी संस्थांच्या माध्यामातून करण्यात येणा-या मृद व जलसंधारण कामांच्या प्रगतिचे GIS, उपग्रह प्रतिमा, मोबाइल आधारित निरीक्षण प्रणाली व ऑनलाइन डॅशबोर्डच्या माध्यमातून संनियंत्रण करणे.

c) राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करणे.

d) महिन्यातून किमान एक बैठक घेणे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०२६११०२१२५२२९३१२६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्य आदेशानुसार व नावाने,

DEVENDRA PANDIT BHAMARE

Digitally signed by DEVENDRA PANDIT BHAMARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Soil and Water Conservation, 2.5.4.20=7FC8A7EEFE50AB61E540936829D8614649D6FEBF79C1E2BABDE15C7569EB880F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=716799EF27C5A6E36AAC6120CFC6E56F4D9991CEA2DBBD722FBFCA28C368854C, cn=DEVENDRA PANDIT BHAMARE
Date: 2026.11.02 12:53:55 +05'30'

(देवेंद्र भामरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. सभापती/उप सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष/ उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मंत्री, मृद व जलसंधारण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. राज्यमंत्री, मृद व जलसंधारण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
११) सर्व सन्माननीय राज्यसभा/लोकसभा सदस्य.
१२) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य.
१३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१४) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) - १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१९) आयुक्त (मृद व जलसंधारण), छत्रपती संभाजीनगर.
२०) आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
२१) आयुक्त (कृषी), पुणे.
२२) आयुक्त (मनरेगा), नागपूर
२३) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२५) संचालक, फलोत्पादन, पुणे.
२६) महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर.
२७) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२८) सर्व मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग.
२९) सर्व अधिक्षक अभियंता, मृद व जलसंधारण विभाग.
३०) सर्व कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग.
३१) जल-७, निवड नस्ती.